Along with Exh.1

स.क्रि.के.नं. ५७/२०२६

गारगोटी येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट सो।

यांचे कोर्टात...

श्री.अविनाश केरबा किल्लेदार - फिर्यादी

विरुध्द

श्री. सदाशिव अनंत नाईक - आरोपी

## व्हेरिफिकेशन

देवाची शपथ खरे सांगतो की, मी, श्री.अविनाश केरबा किल्लेदार व. व. ३१, रा.वेसर्डे, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर आज मुक्काम गारगोटी सत्य प्रतिज्ञेवर सरतपास जबाबाचे शपथपत्र करतो की,

१) मी फिर्यादीत नमुद केले पत्यावर राहणेस आहे. आरोपी हे शिवडांव बु॥, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर येथे राहणेस आहेत.

२) माझे व आरोपी सदाशिव अनंत नाईक व श्रीमती सुनंदा अनंत नाईक यांचे दरम्यान शिवडाव बु॥, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर येथील गट नं. ४३ याचे एकूण क्षेत्र हे.०८-४८.०० आर., आकार रु. ६-७४ पैसे पैकी आरोपी व त्यांची आई यांचे हिस्सेस असलेले हे.४-२४.०० आर. पैकी हे.०१-२०.०० आर. क्षेत्राबाबत खरेदीबाबतचे संचकारपत्र दि. २५/७/२०२५ रोजी झालेले होते. मी आरोपीस रक्कम रु. १,००,०००/- (एक लाख रु.) इसारतीपोटी चेक व्दारे आरोपीस दिलेले होते. सदरचा चेक वटवून आरोपीस

Seen.

Asstt. Supdt.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.07.22 17:22:01 +0530

रक्कम मिळालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये २०,००,०००/- (वीस लाख रु.) आरोपीचे खातेवर भरणेचे होते व रक्कम रु. ४५,००,०००/- (पंचेचाळीस लाख) आरोपीस व आरोपीचे आईस खरेदीपत्रा दिवशी देणेचे होते.

सदर मिळकतीचे खरेदीकामी आवश्यक त्या सरकारी परवानग्या तसेच, हिस्सेदारांना खरेदीपत्रादिवशी हजर ठेवून खरेदीपत्र करुन देणेची जबाबदारी आरोपी व आरोपीचे आईने घेतलेली होती.

अशी परिस्थिती असताना, करारपत्रानंतर दोन महिण्यात फिर्यादी यांनी आरोपीस परवानगी बाबत व हिस्सेदारांचे मान्यतेबाबत विचारले असता, आरोपी यांनी परवानगी करीता प्रयत्न चालू आहेत, काळजी करु नका असे सांगीतले. तद्नंतर पुन्हा फिर्यादी यांनी आरोपीकडे चौकशी केली असता, आरोपी यांनी फिर्यादी यांना समाधानकारक उत्तर दिलेले नाही व करारपत्र रद्द करुन घेवूया असे म्हणू लागले. तसेच, इसारत दिलेली रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रु.) परत घेवून जा असे सांगू लागले. आरोपीची अडचण लक्षात घेवून फिर्यादी यांनी करारपत्र रद्द करणेचे ठरविले व रक्कम रोखीत न घेता चेक ने द्या असे आरोपीस सांगीतले. आरोपी याने त्याचे खाते असलेल्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बॅक शाखा तांबाळे, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर कडील अकौंट पे चेक नं. ०००१४३ चा दि. १८/११/२०२५ चा दिला व वटणेची खात्री दिली.

आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून फिर्यादीने सदरचा चेक स्विकारला व तो चेक त्याच दिवशी त्यांचे खाते असलेल्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बॅक शाख वेसर्डे येथे जमेस दिला. सदरचा चेक ११/१२/२०२५ रोजी न

Asstt. Supdt.

वटता 'फंड्स इन सफिशिएंट' या शे-यानीशी बॅक मेमोसह परत आला. आरोपी यांनी चेक न वटता परत आलेनंतर वकीलांमार्फत दि. २७/१२/२०२५ रोजी नोटीस दिली. सदरची नोटीस आरोपीस दि. २९/१२/२०२५ रोजी पोहचलेली आहे. परंतू आरोपी यांनी फिर्यादीस मुदतीमध्ये पैसे दिलेले नाहीत.

३) आरोपी यांनी दिले चेकचा आदर करणे गरजेचे होते परंतू खातेवर पैसे शिल्लक नाहीत या कारणाने सदरचा चेक परत आलेला आहे. पैसे खात्यावर नसलेचे जाणिव असतानाही फिर्यादी यांना पैसे मिळू नयेत या दुष्ट हेतूने आरोपी यांनी फिर्यादी यांना खोटा न वटणारा चेक दिलेला आहे व फिर्यादी यांची फसवणूक केलेली आहे. फिर्यादी यांनी आरोपीस कायद्यातील तरतुदीप्रमाणे दि. २७/१२/२०२५ रोजी नोटीस पाठविलेली आहे. सदरची नोटीस आरोपीस दि. २९/१२/२०२५ रोजी मिळालेली आहे. कायदा मुदतीत आरोपीने फिर्यादी यांचे पैसे परत दिलेले नाहीत त्यामुळे फिर्यादी यांना आरोपी विरुध्द प्रस्तुतची फिर्याद मे.कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

**४) सबब, फिर्यादीची विनंती की, -**

**आरोपी ने फिर्यादी यांची वर नमुद केलेप्रमाणे फसवणूक केलेली आहे. सदर फसवणूकीबाबत सत्वर चौकशी होवून आरोपीला कायद्यातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त शिक्षा व्हावी व चेक च्या रक्कमेच्या दुप्पट दंड आरोपीकडून फिर्यादी यांना मिळावा ही विनंती म्हणून केले व्हेरिफिकेशन असे.**

गारगोटी
दिनांक : २२/०७/२०२६
**मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो**

**(ॲड. योगेश आर. कदम)**

**फिर्यादी**

Asstt. Supdt.

## प्रतिज्ञा

यात मी अविनाश केरबा किल्लेदार व.व. ३१, व्यवसाय- शेती व व्यापार, रा. वेसर्डे, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर आज मुक्काम गारगोटी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद व्हेरिफिकेशनमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा असे .

गारगोटी
दिनांक : २२/०७/२०२६

Killedar
..............
फिर्यादी

Solemnly Affirmed before me by
Shri. Avinash Keraba Killedar age 31
of R/o Yogesh Ro R/s Vesarde Tal Bhudargad Kop
who is identified by
Shri. Adv. Y. R. Kadam
whom I know personally
Date- 22/7/26
Asstt. Supdt.